# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर ४१६ ००४

---

क्र.कोविमं/माध्य.गोप./परीक्षा / 5464
दिनांक :- ०४/११/२०२०

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय:-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा नोंव्हेंबर-डिसेंबर २०२० तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणतक्ते भरणेबाबतच्या व साहित्य वितरणाबाबतच्या सुचना.**
**संदर्भ:- राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा -६ /४४११/ दिनांक २०/१०/२०२०**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(इ.१०वी) नोंव्हेंबर-डिसेंबर २०२० परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विदयार्थ्यांच्या भाषा विषयाची तोंडी परीक्षा तसेच विज्ञान व गणित, तंत्र व पूर्व व्यावसायिक, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा बुधवार दि. १८/११/२०२० ते शनिवार दि. ०५/१२/२०२० रोजी आयोजित करण्यात याव्यात. या विभागीय मंडळामार्फत तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत मुल्यमापन परीक्षेच्या साहित्याचे वाटपाच्या तारखेविषयी स्वतंत्रपणे सुचना देण्यात येतील.

**गुणतक्तेभरण्याबाबतच्या व मंडळाकडे सादर करण्याबाबतच्या सुचना**

नोंव्हेंबर-डिसेंबर २०२० ची शास्त्र प्रात्यक्षिक परीक्षा केंद्रस्थळी होत असल्यामुळे प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणतक्ते केंद्र शाळेकडे देण्यात येणार असून आपण केंद्रशाळेशी संपर्क साधून प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळेचे निश्चितीकरण करुन विद्यार्थ्यांना त्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षा देणे सुलभ होईल.

भाषा विषयाची तोंडी परीक्षा, गणित विषयाची अंतर्गत मुल्यमापन परीक्षा तसेच तंत्र व पूर्व व्यावसायिक, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा या संबंधित शाळेतच घ्यावयाच्या असल्यामुळे विज्ञान प्रात्यक्षिक व्यतिरीक्त इतर सर्व विषयांचे गुणतक्ते आपल्या शाळेस देण्यात येत असून ते नेहमीप्रमाणे OMR पध्दतीचे असल्यामुळे गुणतक्ते भरताना Scanning योग्यरितीने होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१) प्राप्त गुण बैठक क्रमांक (Seat No) समोर दिलेल्या चौकटीतच सुवाच्य अक्षरात भरावे व त्या अनुषंगाने समोरील OMR चे वर्तुळ काळ्या/निळ्या (Black/Blue) शाईने भरावे.
२) बारकोडवर काहीही लिहू नये तसेच सही करू नये. तसेच OMR शीटला फोल्ड/स्टेपल करू नये.
३) गुणपत्रिका (Marklist) भरताना OMR चे वर्तुळ भरलेले आहे व खाली Page Total केलेली आहे याची खातरजमा करून घेण्यात यावी.
४) सदर देण्यात येणाऱ्या OMR पध्दतीच्या गुणपत्रिकेमध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये.
५) गुणपत्रिकेमध्ये असलेल्या छापील बैठक क्रमांकाच्या गुणांच्या बेरजेची गुणतक्त्यात नोंद घ्यावी. मात्र अतिरीक्त बैठक क्रमांकाने अथवा ऐनवेळी विषय बदल झाल्याने परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे

बैठक क्रमांक OMR पध्दतीच्या गुणपत्रिकेमध्ये नसल्याने अशा विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक संबंधित विषयाच्या गुणतक्त्यामध्ये शेवटी लिहून त्याची त्यासह बेरजेची गुणतक्त्यात नोंद घ्यावी.

६) सर्व विषयांचे गुणतक्ते काळजीपूर्वक भरून ते अनुक्रमांकानुसार मंडळाने पुरविलेल्या पाकिटात सादर करावे.

भाषा विषयाची तोंडी परीक्षा तसेच गणित, तंत्र व पूर्व व्यावसायिक, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य परीक्षा झाल्यानंतर शाळांनी वितरण केंद्रावर दिनांक ०७/१२/२०२० रोजी न चुकता जमा करावयाचे आहे. केंद्र शाळेने त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या शाळांचे विज्ञान विषयाचे गुणतक्ते व उत्तरपत्रिका यांचे एक पाकिट करावे व सदरचे साहित्य केंद्र शाळांनी दिनांक ०७/१२/२०२० रोजी संबंधित वितरण केंद्रावर न चुकता जमा करावे. सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व वितरण केंद्रानी त्यांच्याकडे जमा झालेले साहित्य त्यांच्या प्रतिनीधीमार्फत तालुकानिहाय व शाळानिहाय व्यवस्थित लावून दि. ०९/१२/२०२० रोजी मंडळ कार्यालयात न चुकता जमा करावयाचे आहे याची वितरण केंद्रप्रमुखांनी नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रत माहिती तथा कार्यवाहीसाठी :

१) केंद्र संचालक

केंद्रप्रमुखांनी प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य वितरण केंद्रावर दिनांक ०७/१२/२०२० रोजी जमा करावे.

२) जिल्हा वितरण केंद्र

कळविण्यात येते की मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या साहित्याचे नियोजित दिवशी वितरण करावे आणि शाळांकडून आपणाकडे जमा झालेले साहित्य आपल्या प्रतिनीधीमार्फत तालुकानिहाय व शाळानिहाय व्यवस्थित लावून दि. ०९/१२/२०२० रोजी मंडळ कार्यालयात न चुकता जमा करावयाचे आहे